# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

प्रधान कार्यालय : "मुंबै बँक भवन", २०७, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

जा.क्र.मुंबै बँक/हिशेब विभाग/फा-व्याजदर/२०१७-२०१८/९०८२ (A) दिनांक :- २०/०६/२०१७

## - परिपत्रक -

दि.०७/०६/२०१७ रोजीच्या मा.संचालक मंडळ सभेतील निर्णयानुसार **दि.२१/०६/२०१७ पासून बँकेच्या अल्प मुदत व मुदत कर्जावरील व्याजदर** खालील नमूद केल्याप्रमाणे लागू राहतील.

| अ. क्र | कर्ज प्रकार तपशील | सुधारीत व्याजदर द.सा.द.शे.२१/०६/२०१७ पासून |
|---|---|---|
| १ | नागरी बँका | १०.००% |
| २ | **पगारदार सहकारी संस्था** | |
| | A - ग्रेड | ९.५०% |
| | B - ग्रेड | ९.७५% |
| | C - ग्रेड | १०.००% |
| ३ | **नागरी सहकारी पतसंस्था** | |
| | A - ग्रेड | १०.१५% |
| | B - ग्रेड | १०.२५% |
| | C - ग्रेड | १०.५०% |
| ४ | ग्राहक सहकारी संस्था (प्राथमिक व मध्यवर्ती) | १०.५०% |
| ५ | मच्छिमार सहकारी संस्था | १०.५०% |
| ६ | मजुर सहकारी संस्था | १०.५०% |
| ७ | महिला औद्योगिक सहकारी संस्था | १०.५०% |
| ८ | इतर औद्योगिक सहकारी संस्था | १०.५०% |
| ९ | बेरोजगार/सेवा व नाविन्यपूर्ण सहकारी संस्था | १०.५०% |
| १० | गृहनिर्माण सहकारी संस्था (इमारत दुरुस्ती बांधकाम व सोलर सिस्टिम) | १०.५०% |
| ११ | गृहनिर्माण इमारत पुनर्बांधणी (Redevelopment) | १३.५०% |
| १२ | इतर सहकारी संस्था | १०.५०% |
| १३ | सहकारी संस्थांचे माध्यमातून घरकर्ज सहकारी संस्था | १०.००% |
| १४ | कॉर्पोरेट कर्ज सहकारी संस्था | १२.५०% |
| १५ | व्यक्तीगत घरकर्ज | फिक्स व्याजदर |
| | १५ वर्षे | महिलांसाठी (फ्लोटींग) ८.५०%<br>पुरुषांसाठी (फ्लोटींग) ८.६५%<br>सर्वांसाठी (फिक्स) ९.५०% |
| | गिरणी कामगार सवलतीचा व्याजदर | फिक्स ९.५०% |
| १६ | वाहनकर्ज | फिक्स १०% |
| १७ | मशिनरी तारण गहाण कर्ज | फिक्स ११% |
| १८ | स्थावर मालमत्ता तारण कर्ज | फिक्स ११% |
| १९ | शैक्षणिक कर्ज | फिक्स १०% |
| २० | वैयक्तिक बिल डिस्काऊंटींग | १४% |
| २१ | व्यावसायिक / धंदेवाईक/ व्यापारी/ नवउद्योजक इत्यादींसाठी | १२% |
| २२ | सेवा क्षेत्राशी निगडीत / व्यवसायसाठी | १२% |
| २३ | पगारदार व्यक्तिंसाठीचे वैयक्तिक कर्ज | १२% |
| २४ | सोनेतारण अधिकर्ष कर्ज (रु.२५.०० लाखांपर्यंत) | १०.५०% |
| २५ | सोनेतारण बुलेट कर्ज (रु.२.०० लाखांपर्यंत) | १०.५०% |
| २६ | एन.एस.सी. किसान विकास पत्र, तारण अधिकर्ष कर्ज | १०.५०% |
| २७ | जीवन विमा पॉलिसी तारण कर्ज | १०.५०% |
| २८ | मुदत ठेवीचे तारणावर अधिकर्ष सवलत | ठेवीवरील व्याजदरापेक्षा जादा ०.४५% |

| | | |
|---|---|---|
| २९ | तात्पुरते अधिकर्ष कर्ज | १६% |
| ३० | स्वयंसहाय्यता बचत गट | १२% |
| ३१ | आय.बी.पी. (सहकारी संस्था व वैयक्तिक) | १६% |

उपरोक्त व्याजदरासाठी खालीलप्रमाणे अटी लागू राहतील.

१) कर्जावरील व्याजदर २१/०६/२०१७ रोजी व तदनंतर नविन मंजूर होणाऱ्या व नुतनीकरण होणाऱ्या कर्जासाठी लागू राहतील.

२) मुदत कर्जावरील व्याजदर हे बदलते असून दरवर्षी ते रिसेट करणेत येतील.

३) यापूर्वी मंजूर झालेल्या व उचल झालेल्या घरकर्जावरील व्याजदर १०% पेक्षा जास्त असल्यास सदरचे व्याजदर कर्जदाराच्या लेखी विनंतीनुसार परतफेड क्षमता व परतफेड हप्ता रक्कम व उर्वरीत कर्ज परतफेडीसाठी उपलब्ध कालावधी विचारात घेऊन द.सा.द.शे. ९.५०% या फिक्स व्याजदराने रिसेट करुन देण्यात येतील.

**४) घरकर्जावरील व्याजदर रिसेट करुन देतेवेळी कर्ज येणेबाकी रक्कमेवर १% प्रमाणे रिसेट चार्जेस करासह एक रक्कमी आकरण्यात यावेत व कर्जदाराकडून रिसेट चार्जेसचा भरणा झालेनंतर कर्ज हप्ता परतफेडीच्या तारखेपासून घरकर्जवरील व्याजदर रिसेट करुन देण्यात येतील.**

५) नविन व जुन्या घरकर्जावर मंजूर होणाऱ्या (गिरणी कामगारांच्या घरकर्जासह) नविन टॉपअप कर्जावरील व्याजदर हे द.सा.द.शे ९.५०% व्यादराप्रमाणे फिक्स राहतील. सदर दोन्ही कर्जाची एकत्रीत कर्ज मर्यादा रु.२५.०० लाख या प्रमाणे राहिल.

६) बँकेच्या कर्ज धोरणानुसार अन्य बँका अथवा आर्थिक संस्थाकडील घरकर्ज टेकओव्हर करणेसाठी मंजूर होणाऱ्या घरकर्जावरील व्याजदर हे घरकर्जासाठी असलेल्या वरील व्याजदराप्रमाणे तर टॉप ऑप कर्जासाठी व्याजदर द.सा.द.शे ९.५०% याप्रमाणे फिक्स राहील. सदर दोन्ही कर्जाची एकत्रीत कर्ज मर्यादा रु.२५.०० लाख या प्रमाणे राहिल.

७) दिनांक ०१/०४/२०१७ पासून मंजूर झालेल्या नवीन घर कर्जावरील फ्लोटींग पध्दतीचे व्याजदरामध्ये प्रतीवर्षी एक एप्रिल पासुन बदल करुन **परतफेड हप्त्यांची रक्कम**, कर्ज परतफेडीचा उर्वरित कालावधी विचारात घेऊन बदललेल्या व्याजदरानुसार पुनर्रचित करण्यात येईल.

८) कर्जाचे परतफेडीचे हप्ते दरमहा व्याजासह (DAILY REDUCING BALANCE) पध्दतीने निश्चित करण्यात येतील.

९) "अ" व "ब" ग्रेड मधील पगारदार व नागरी सहकारी पतसंस्थांनी मंजूर कर्जाची ७०% उचल तीन महिन्यात न केल्यास १% प्रमाणे दरमहा कमिटमेंट चार्जेस करासह उचल न झालेल्या कर्ज रक्कमेवर अकारण्यात येतील.

१०) ज्या पगारदार सहकारी संस्था मंजूर कर्ज रक्कमेच्या ७०% एवढया रक्कमेच्या मुदत ठेवी लिन मार्क व डिसचार्ज करुन ठरावासह बँकेच्या ताब्यात देतील अशा संस्थांच्या कर्जावरील व्याजदर द.सा.द.शे. ९.२५% प्रमाणे राहिल.

**सहाय्यक सरव्यवस्थापक**
**हिशेब विभाग**

**प्रति,**
शाखा व्यवस्थापक / विस्तारकक्ष प्रमुख
------------------------ शाखा / विस्तारकक्ष

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव**

१. सहाय्यक सरव्यवस्थापक / व्यवस्थापक
-------------------- विभाग
२. विभागीय व्यवस्थापक - विभाग क्रमांक : ----
३. स्वीय सचिव, मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष/सरव्यवस्थापक

**सहाय्यक सरव्यवस्थापक**
**हिशेब विभाग**

Z:\Vaishu\wb11023.doc